पुणें

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ

पुरस्कृत ग्रंथमाला क्रमांक ४

शिवचरित्र प्रदीप

द. वि. आपटे

स. म. दिवेकर

कागदी प्रत रु. ३॥]   शके १८४७   [कापडी प्रत रु. ४

९ घोडेगांवकर वहींतील शकावली.

जन्म शक १५५१ श्री

सीवाजी राजा याणी सीव २ रामउचार करून समाप्ति जाले ॥ शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुा १५ रवीवारे

येकनाथ माहाराज परंधामाप्रती गेले तेव्हा समर्थ बेवीस महिन्याचे होते शके १५३१ ॥ फाल्गुन वद्य ६ सौम्यनाम सवत्सरे

समर्थ आसता तुकाराम माहाराज शके १५७१ वीरोधी नाम सवत्सरे फालगुण वाा ५ सोमवार देह भार्गीर्थीत पडला.

वामन स्वामी शके १५७९ वैशाख शुा ६ जयनाम सवत्सरे वारणातीरी कोरेगावी समाधिस्त जाले ॥

ज्ययरामस्वामी वडगावकर वडगावी शके १५९४ भादपद * वद्य ११ गुरुवार परिधावी नाम सवत्सरे

रंगनाथ स्वामी ब्रम्हनाळकर शके १५८८ परा [भ] व नाम सवत्सरे भाद्रपद शुा २

समर्थाचे मागे श्रीरंगनाथ स्वामी निगडीकर नीगडीस समाधीस्त जाले शके ×१६०६ रक्ताक्षी नाम सवत्सरे मार्गशीर्ष वाा १०

आत्मास्वामी निगडीकर नीगडीस शके १६२७ पार्थीव नाम सवत्सरे श्रावण शुा ८

आनंदमुर्ती शके १६१८ धाता नाम सवत्सरे कार्तीक शुा १४+

—०—

१० सहा कलमी शकावली.

शके १५५१ शुक्ल नाम संवछरे ईदलशाई सुलतान सिकंदर पातशा विज्यापूर याचे दिवाणगिरी खवासखान व मुऱ्हार जगदेऊ राऊ यास जाली कलम १

शके १५५२ प्रमोद नाम संवछरी मुऱ्हार जगदे राऊ ईदलशाई भोटे फौज-

× हीं अक्षरें प्रारंभीं आडवी लिहिलीं आहेत.

* 'शुद्ध' असें पाहिजे म्हणजे तिथी वार, संवत्सर यांचा मेळ जमेल.

+ ही शकावली ज्या वहींत आहे त्या वहींची माहिती तिच्यांतच अखेरीस आहे ती अशीः—" हें पुस्तक गंगाभागीरथी गंगाबाई भ्रतार महिपतभट तपस्वी घोडेगांवकर मुकाम श्रीप्रयाग येथें विनायक यदुरकर यानी दिल्हे शके १७६५ तेव्हा तें पुस्तक गंगाबाईनी नारो बालाळ पुरंदरे यास दिल्हे हाली रंगो नारायण पुरंदरे याजपासी आहे आसे "

निसी निजामशाईवर चालोन आले पुणा कसबा वस्ती जाळून गाढवाचा नांगर पांढरीवर धरिला सात आठ वर्षे कसबा वोस पडला होता पाहार रोविली होती कलम

सके १५५३ प्रमाथी नाम संवछरी मुऱ्हार जगदेराऊ याची व निजामशाई मलिक आंबर याची लढाई जाली नजिकल बास वड मलिकाचा मोड जाला मुऱ्हार जगदेव पाठी लागले भिमेने उतार मलिकास दिल्हा मुऱ्हार जगदेराऊ यास उतार नाही त्याणी भीमातीरी नागरगांव येथें भीमाइंद्रायेणी संगमी फौजे सहित मुक्काम केला मग तह जाहला भिमेचा पुणें देश ईदलशाईकडे आला कलम १

शके १५५५ श्रीमुख नाम संवत्सरे भाद्रपदी आमावशेस सूर्यग्रहण सोमवतीपर्व जाले ते समई मुऱ्हर जगदेराऊ याणी चोवीस तुळा केल्या छावा हातीचा सोन्याची तुळा केली शाहजी राजे भोसले निज्यामशाईहून रुसून अले ते जवल होते नागरगाव ब्राह्मणांस आग्रहर धारादत चोवीस भाग करून दिल्हे मग तुळापूर नाव ठेविले कलम १

शके १५५६ भाव नाम संवत्छरे मुऱ्हर जगदेराऊ याणी भुलेश्वरानजीक डोंगरावर दौलत मंगल किला बांधिला तेथ राहून मुलकाचा बंदोबस्त करून अठदाहा वर्षे होते मामले दौलतमंगल [पान ३०] आसे कागदोपत्री चालले कलम १

शके १५५७ युव नाम संवत्छरी शाहजी राजे भोसले यांसि बारा हजार फौजेची सरदारी इदलशाईकडून जाली सरजांमास मुलूक दिल्हे त्यात पुणें देश राज्याकडे दिल्हा राज्यानी आपले तर्फेने दादाजी कोंडदेव मलटणकर यांसि सुभा सांगून पुणियास ठाणे घातले तेव्हां सोन्याचा नांगर पांढरीवर धरिला शांती केली मग सुभेदार याणी कसब्याची व गावगनाची प्रांतात वस्ती केली कोल्याचवषे दिल्हे साहांवे साली तनखा घेतला शाहजी राजे विज्यापूर प्रांती गेले कलम १

[शिवापूरकर वही अव्वक्त नकल पान २९–३०]

---

११ बखरींतील शिवजन्माचीं वर्णनें.

१ **सभासद** रचना काल शके १६१९ (स. १६९७.) पृ. २-३

पुढें राजश्री मालोजी राजे यांचे पोटीं राजश्री शाहाजी राजे [व] राजश्री सरफजी राजे हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाहीमध्यें दौलता केल्या. दौलत करीत असतां निजामशाही बुडाली. यावरि शाहाजी राजे इदलशाही